# मिरा भाईंदर महानगरपालिका
## सामान्य प्रशासन विभाग
मुख्यालय, पहिला मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर
(प.) दूरध्वनी क्र.022-28192828 ई-मेल आयडी gad@mbmc.gov.in

जा.क्र. मनपा/सा.प्र./ ४७/२०२६-२७ दि.२४/०४/२०२६

## कार्यालयीन आदेश

**विषय :-** २८ एप्रिल हा दिवस "सेवा हक्क दिन" म्हणुन साजरा करणेबाबत.
**संदर्भ :-** १) सामान्य प्रशासन विभाग,शा,नि.क्र.GAD/९४/२०२४-lokshahidin दि. ०१ एप्रिल, २०२५
२) राज्य मुख्य सेवा आयुक्त यांचे पत्र क्र.संकिर्ण-२०२५/प्र.क्र.२७/मुसेहआ/कक्ष-२ दि. ९ एप्रिल २०२५
३) क्र.मलोसे क्र-०४२५/प्र.क्र.५८/नवि-३२ यांचे दि. १० एप्रिल, २०२६ रोजीचे पत्र

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते कि, दि. 28 एप्रिल, 2026 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यालयांमध्ये "सेवा हक्क दिन साजरा करणेकामी विशेष कार्यक्रम आयोजित करण्याबाबत तसेच संबंधित कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्याबाबत सर्व संबंधितांना नगर विकास विभागामार्फत सूचना देणेबाबत राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्तांनी संदर्भाधीन क्र.2 पत्रांन्वये आदेशित केले आहे.

त्यादृष्टीने सर्व मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात नागरिकांमध्ये उक्त अधिनियमाबाबत राज्य सेवा हक्क आयोगाबाबत तसेच आपले सरकार पोर्टल मार्फत ऑनलाईन उपलब्ध सेवांबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी दि. 28 एप्रिल, 2026 रोजी "सेवा हक्क दिना" च्या निमित्ताने नागरी भागात विविध कार्यक्रम आयोजित करावयाचे असून कार्यक्रमांचा तपशिल खालीलप्रमाणे ( प्रपत्र- क नुसार) देण्यात येत आहे.

प्रपत्र — क

| अ.क्र. | सेवा हक्क दिनाच्या निमित्ताने मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये आयोजित करावयाचे कार्यक्रम | कार्यवाही करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव |
|---|---|---|
| १. | दि.२८ एप्रिल २०२६ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, दुसरा मजना येथे विशेष सभेचे आयोजन करणे, त्यात महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या प्रती सर्व सदस्यांना देणे व उक्त कायद्याच्या ठळक तरतूदीचे वाचन करणे आणि संबंधित सेवा देण्याच्या कामगिरीविषयी अहवाल सादर करणे. | श्री. सुनिल यादव<br>सहा. आयुक्त (आस्था) |
| २. | सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. आसेके-१७२५/प्र.क्र.८६/मातं(३९), दि.२७ मार्च २०२५ अन्वये नवीन आपले सरकार सेवा केंद्रांचे उद्घाटन / कार्यान्वयन करणे. दि.२८ एप्रिल २०२६ रोजी मि.भा.मनपा मुख्य कार्यालय व सर्व प्रभाग समिती (१ ते ६) यांनी नागरी सुविधा केंद्र (CFC) मार्फत नागरिकांना सर्व ऑनलाईन अधिसूचित सेवा आपल्या नागरी सुविधा केंद्रातून देण्याची सुरुवात करणे. | १) श्री. राजकुमार घरत,<br>सिस्टिम मॅनेजर,<br>२) सर्व प्रभाग अधिकारी<br>(प्र.स.क्र. १ ते ६) |
| ३. | दि. २८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिकेतील सर्व खाते प्रमुख/विभाग प्रमुख व सर्व प्रभाग अधिकारी व सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी सेवेची बांधिलकी मानणारी शपथ घेणे. (शपथेचा नमूना संलग्न) | सर्व खातेप्रमुख/विभागप्रमुख यांनी आपले कार्यालयात स्वतंत्र रीत्या शपथ सोहळा आयोजीत करणे. |
| ४. | मि.भा.मनपा क्षेत्रात गर्दीचे ठिकाणी जसे की. प्रभाग कार्यालय, पर्यटन स्थळे, तीर्थ स्थळे. महाविद्यालयीन परिसर इत्यादी ठिकाणी महाराष्ट्र | १) श्री. राजकुमार घरत,<br>सिस्टिम मॅनेजर,<br>२) सर्व प्रभाग अधिकारी |

| | | |
|---|---|---|
| | लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ विषयी माहिती फलक (QR कोडसह) प्रदर्शित करणे. | (प्र.स.क्र. १ ते ६) |
| ५. | मिरा भाईंदर महानगरपालिकेतील प्रत्येक कार्यालयांमध्ये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत विहित सूचना फलक या पूर्वी लावले नसल्यास तसे माहिती फलक लावणे. (नमूना संलग्न) | १) श्री. राजकुमार घरत, सिस्टिम मॅनेजर.<br>२) श्रीम. मनस्वी म्हात्रे, विभाग प्रमुख (भांडार). |
| ६. | मिरा भाईंदर महानगरपालिकेतील प्रत्येक कार्यालयांमध्ये अधिसूचित सेवांची व शुल्कांची माहिती देणारा QR CODE लावणे. | १) श्री. राजकुमार घरत, सिस्टिम मॅनेजर,<br>२) सर्व प्रभाग अधिकारी (प्र.स.क्र. १ ते ६) |
| ७. | मिरा भाईंदर महानगरपालिकेतील प्रत्येक कार्यालयांमध्ये तक्रार नोंदवण्यासाठी QR CODE लावणे. | १) श्री. राजकुमार घरत, सिस्टिम मॅनेजर,<br>२) सर्व प्रभाग अधिकारी (प्र.स.क्र. १ ते ६) |
| ९. | मिरा भाईंदर महानगरपालिकेतील सर्व कार्यालयांमध्ये नागरिकांना घरपोच सेवा देण्यासाठी "सेवादूत" योजना सुरू करणे. | सर्व प्रभाग अधिकारी (प्र.स.क्र. १ ते ६) |
| १०. | मि.भा.मनपा क्षेत्रातील विद्यार्थी / महिला / इतर घटक यांचेशी सेवा हक्क कायद्याविषयी सुसंवाद साधून सदर कायद्याविषयी जनजागृती करण्याच्या दृष्टीने दि. २८ एप्रिल २०२६ रोजी मेळाव्यांचे आयोजन करणे. | १) श्रीम. दिपाली पोवार सहा. आयुक्त(शिक्षण)<br>२) सर्व प्रभाग अधिकारी (प्र.स.क्र. १ ते ६) |
| ११. | मि.भा.मनपा क्षेत्रातील शालेय / महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५, राज्य सेवा हक्क आयोग व आपले सरकार पोर्टल या संदर्भात दि. २८ एप्रिल २०२६ रोजी निबंध स्पर्धा/वक्तृत्व स्पर्धा परिसंवाद इ. चे आयोजन करणे. | श्रीम. दिपाली पोवार सहा. आयुक्त(शिक्षण) |
| १२. | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या प्रचारासाठी मि.भा.मनपा हद्दीत पथनाट्य, नाटके, गाणे, लोक कलांचा वापर सुरू करणे. | श्री. सिध्देश खेडेकर , सल्लागार व केपीएमजी टिम |

उपरोक्त नेमुन दिलेली कामे विहीत मुदतीत पार पाडावीत. नेमुन दिलेल्या कामात कोणताही हलगर्जीपणा होणार नाही, याची सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी नोंद घ्यावी. तसेच सर्व सबंधितांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल (फोटो व व्हिडीओ) श्री. हेमंत धुरी, लिपीक, आस्थापना विभाग यांचेकडे पाठविण्यात यावा.

**डॉ. सचिन बांगर**
**उपायुक्त (मु.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रत माहितीस्तव,**
**मा. आयुक्त महोदय, मि.भा.मनपा**